आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय बातमीपत्र - दुपारी १.३० वाजता

५ एप्रिल २०२४ - शुक्रवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- लोकसभा निवडणुकीच्या दुसऱ्या टप्प्यातल्या उमेदवारी अर्जांची आज छाननी

- निवडणुकीच्या पहिल्या टप्प्यातल्या प्रचाराला वेग / देशभर राजकीय नेत्यांच्या प्रचारसभा

- काँग्रेसचा जाहीरनामा प्रसिद्ध/ भाजपाचा जाहीरनामा आज प्रसिद्ध होणार

- सलग सातव्या द्वैमासिक आढाव्यात रिझर्व बँकेनं ठेवले व्याजदर कायम/चालू आर्थिक वर्षात चलनफुगवटा दर साडेचार टक्के तर जीडीपी दर साडेसात टक्के राहण्याचा अंदाज

**आणि**

- आयपीएल मधे आज सनरायझर्स हैदराबादची लढत चेन्नई सुपर किंग्जशी

**<><><><><>**

लोकसभा निवडणुकीच्या दुसऱ्या टप्प्यातल्या उमेदवारी अर्जांची छाननी आज होत आहे. या टप्प्यासाठी उमेदवारी अर्ज दाखल करण्याची मुदत काल संपली. या टप्प्यात, १२ राज्यं आणि केंद्रशासित प्रदेशांमधल्या ८८ लोकसभा मतदारसंघात तसंच बाह्य मणिपूर लोकसभा मतदारसंघाच्या काही भागासाठी २६ एप्रिलला मतदान होणार आहे. या टप्प्यामधे केरळात २०, कर्नाटकात १४, राजस्थानात १३ जागा, उत्तर प्रदेश आणि महाराष्ट्रात प्रत्येकी आठ जागा, मध्य प्रदेशात सात जागा, आसाम आणि बिहारच्या प्रत्येकी पाच जागा, तर पश्चिम बंगाल आणि छत्तीसगडमधल्या प्रत्येकी तीन जागांसाठी मतदान होणार आहे. तसंच

मणिपूर, त्रिपुरा आणि जम्मू-काश्मीरमधल्या प्रत्येकी एका जागेसाठीही मतदान होणार आहे.

जम्मू-काश्मीरमध्ये अर्जाची उद्या छाननी होणार आहे.

<><><><>

महाराष्ट्रात बुलडाणा, अकोला, अमरावती, वर्धा, यवतमाळ-वाशिम, हिंगोली, नांदेड आणि परभणी या ८ लोकसभा मतदारसंघात या टप्प्यात मतदान होणार आहे. यासाठी काल अखेर एकंदर ३५२ उमेदवारांनी ४७७ अर्ज दाखल केले आहेत.

<><><><>

लोकसभा निवडणुकीच्या पहिल्या टप्प्यातल्या प्रचाराने वेग घेतला आहे. सर्वच पक्षांचे बडे प्रचारक ठिकठिकाणी सभा घेत आहेत तसंच रोड शो करत आहेत. प्रधानमंत्री आणि भाजपाचे ज्येष्ठ नेते नरेंद्र मोदी आज राजस्थानात चुरू इथं निवडणूक प्रचार सभा घेत आहेत. काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांची काल चितोडगड इथं प्रचार सभा झाली.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी येत्या सोमवारी आठ एप्रिल रोजी महाराष्ट्रात पहिल्या टप्प्यातल्या प्रचारासाठी येणार आहेत. चंद्रपूर- वणी- आर्णी लोकसभा मतदारसंघात भाजपा उमेदवार सुधीर मुनगंटीवार यांच्या प्रचारासाठी ते मोरवा इथं सभा घेणार आहेत.

<><><><>

लोकसभा निवडणुकीसाठी काँग्रेसनं आज जाहीरनामा प्रसिद्ध केला. न्यायपत्र या नावानं हा जाहीरनामा काढण्यात आला असून त्यात ५ न्याय आणि २५

गॅरंटीचा उल्लेख केला आहे. युवक, शेतकरी, महिला, आणि कामगार या वर्गांसाठी विविध घोषणा काँग्रेसने केल्या आहेत. युवकांना रोजगार न मिळाल्यास वार्षिक १ लाख रुपये बेरोजगारी भत्ता, गरीब महिलांना वार्षिक १ लाख रुपये अर्थसहाय्य, शेतकऱ्यांना कर्जमाफी आणि हमीभाव, मनरेगामार्फत किमान ४०० रुपये दर रोज मजुरी, सामाजिक आणि आर्थिक समानतेसाठी जाति आधारित जनगणना, संवैधानिक संस्थांचं जतन, इत्यादी मुद्द्यांचा या जाहीरनाम्यात समावेश आहे. ही जाहीरनामा म्हणजे कोणा एका व्यक्तीने दिलेली गॅरेंटी नसून १३९ वर्षांचा गौरवशाली इतिहास असलेल्या पक्षानं दिलेली आश्वासनं आहेत असं पक्षाध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनी सांगितलं. माजी अध्यक्ष सोनिया गांधी, ज्येष्ठ नेते पी. चिदंबरम यांच्या उपस्थितीत नवी दिल्लीच्या पक्ष मुख्यालयात हा जाहीरनामा प्रसिद्ध करण्यात आला.

भाजपाचा जाहिरनामा आज प्रसिद्ध होणार आहे. केंद्रीयमंत्री आणि ज्येष्ठ नेते राजनाथ सिंह यांच्या नेतृत्वाखाली नेमलेली समिती हा जाहीरनामा तयार करत आहे.

**<><><><><>**

भारतीय मार्क्सवादी कम्युनिस्ट पार्टीनं काल नवी दिल्लीत आपला निवडणूक जाहीरनामा प्रसिद्ध केला. अतिश्रीमंतांवर कर, सामान्य संपत्ती कर आणि वारसा करावरील कायदा तसंच खाजगी क्षेत्रात आरक्षण, आणि राजकीय पक्षांना कॉर्पोरेट कंपन्यांच्या देणग्यांवर बंदी या मुद्द्यांचा जाहिरनाम्यात समावेश असल्याचं पक्षाचे सरचिटणीस सीताराम येचुरी यांनी सांगितलं. आपला पक्ष देशात लोकशाही आणि धर्मनिरपेक्षता अधिक सक्षम करेल, असं ते म्हणाले.

यावेळी प्रकाश करात, वृंदा करात, नीलोत्पल बसू आणि तपन सेन उपस्थित होते.

<><><><><>

आगामी लोकसभा निवडणुकीसाठी दूरदर्शन आणि आकाशवाणीवरून राष्ट्रीय पक्षांना प्रक्षेपण आणि प्रसारणासाठीच्या वेळेचा क्रम निश्चित करण्यासाठी काल नवी दिल्लीत सोडत काढण्यात आली. यामध्ये प्रत्येक राष्ट्रीय पक्षाला ४५ मिनिटांचा प्रसारण कालावधी देण्यात आला आहे. तर सहा राष्ट्रीय पक्षांना अतिरिक्त पाच तास तीस मिनिटांचा प्रक्षेपण कालावधी देण्यात आला आहे. १६ आणि २३ एप्रिलला तसंच मे महिन्याच्या ३, १०, १७, २२ आणि २९ या तारखांना हे प्रसारण करता येईल.

<><><><><>

मतदानाचं प्रमाण अत्यल्प असलेल्या ११ राज्यांमधल्या निवडक महानगरपालिकांचे आयुक्त आणि जिल्हा निवडणूक अधिकारी यांची विशेष बैठक केंद्रीय निवडणूक आयोगानं आज नवी दिल्ली इथं सुरु आहे. आगामी लोकसभा निवडणुकांमध्ये मतदानाचं प्रमाण वाढविण्याच्या दृष्टीनं विविध उपाययोजनांवर या बैठकीत चर्चा होणार आहे. निवडणूक आयोगानं दिलेल्या माहितीनुसार, या बैठकीमध्ये मुंबई, दिल्ली, चेन्नई, बंगळूरू, हैद्राबाद, अहमदाबाद, नागपूर, पुणे, ठाणे, पटना साहिब, लखनौ आणि कानपूर या पालिकांचे आयुक्त आणि बिहार आणि उत्तर प्रदेशमधले निवडक जिल्हा निवडणूक अधिकारी सहभागी झाले आहेत. मुख्य निवडणूक आयुक्त राजीव कुमार यांच्या अध्यक्षतेखाली होणाऱ्या या बैठकीला इतर दोन निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार आणि सुखबीर सिंग संधू उपस्थित आहेत. शहरी भागातील जनतेची उदासीनता आणि ग्रामीण भागातून

शहरांकडे स्थलांतर ही मतदानाची टक्केवारी वाढत नसल्याची प्रमुख कारणं असल्याचं मुख्य निवडणूक आयुक्त राजीव कुमार यांनी वेळोवेळी अधोरेखित केलं आहे.

<><><><><>

श्रोतेहो, राज्यातल्या लोकसभा मतदारसंघातले उमेदवार, निवडणूक लढवण्यामागची त्यांची भूमिका, स्थानिक राजकारण यांचा आढावा घेणारा 'लोकनिर्णय महाराष्ट्राचा' हा कार्यक्रम, आकाशवाणीनं सुरू केला आहे. कार्यक्रमाच्या आजच्या भागात आपण गडचिरोली-चिमूर लोकसभा मतदार संघाचा आढावा घेणार आहोत. संध्याकाळी सव्वा सात ते साडे सात वाजेपर्यंत आकाशवाणी मुंबईच्या अस्मिता वाहिनीवर आणि समाज माध्यमांवर हा कार्यक्रम ऐकता येईल.

<><><><><>

भारतीय रिझर्व्ह बँकेनं सलग सातव्यांदा रेपो दर साडे सहा टक्के ठेवला आहे. भारतीय रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर शक्तिकांत दास यांनी २०२४-२५ या आर्थिक वर्षाच्या पहिल्या पतधोरण समितीच्या आढावा बैठकीत ही माहिती दिली. रेपो दरात कोणताही बदल केला नसल्यानं गृहकर्ज महाग होणार नाही. चलनफुगवटा दरातली स्थिरता आणि आर्थिक घडामोडी लक्षात घेऊन हा निर्णय घेण्यात आल्याचं शक्तिकांत दास यांनी वार्ताहरांशी बोलताना सांगितलं. रिझर्व्ह बँकेनं २०२४- २५ या आर्थिक वर्षासाठी सकल देशांतर्गत उत्पादन वाढीचा दर सात टक्के तर किरकोळ महागाई दर साडे चार टक्के रहाण्याचा अंदाज व्यक्त केला आहे. रिझर्व्ह बँकेनं फेब्रुवारी २०२३मध्ये रेपो दर साडे सहा टक्के केला होता.

<><><><><>

बँकेत रोख जमा करण्यासाठीच्या यंत्रांमधे युपीआयचा वापर करून पैसे जमा करण्यासाठी रिझर्व्ह बँक लवकरच परवानगी देणार आहे. या सुविधेमुळे ग्राहकांची सोय होईल आणि बँकामध्ये पैसे हाताळण्याची प्रकिया अधिक कार्यक्षम होईल असं रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर शक्तिकांत दास यांनी आज सांगितलं. रिझर्व्ह बँकेनं पीपीआय वा ॅलेटमधून युपीआयद्वारे व्यवहार करण्यासाठी अन्य ॲप्स वापरण्याची परवानगी देण्याचाही प्रस्ताव दिला आहे.

**<><><><>**

आयपीएल क्रिकेट स्पर्धेत आज सनरायझर्स हैदराबादचा सामना चेन्नई सुपर किंग्जशी होणार आहे. हैदराबादच्या राजीव गांधी आंतरराष्ट्रीय स्टेडियमवर संध्याकाळी साडेसात वाजता हा सामना सुरु होईल.

दरम्यान काल रात्री झालेल्या सामन्यात पंजाब किंग्जनं गुजरात टायटन्सचा तीन गडी राखून पराभव केला.

**<><><><>**

केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळानं राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० नुसार त्यांच्या परीक्षेच्या मूल्यांकन आणि मूल्यमापनाच्या पद्धतीत बदल केले आहेत. हे नवीन स्वरूप क्षमतेवर आधारित प्रश्न आणि कमी पर्याय असणाऱ्या प्रश्नांवर आधारित असेल. सुधारित मार्गदर्शक तत्त्वांनुसार यंदा इयत्ता ११ वी आणि १२ वी च्या प्रश्नपत्रिकेत बहुपर्यायी प्रश्न, विविध स्रोतांवर आधारित प्रश्न, अशा क्षमता आधारित प्रश्नांचं प्रमाण ४० टक्क्यांवरून ५० टक्क्यांवर करण्यात आलं आहे. दीर्घोत्तरी आणि लघुत्तरी प्रश्नांचं प्रमाण ४० टक्क्यांवरून ३० टक्के करण्यात आलं आहे.

**<><><><>**

भारतीय हवामान विभागानं पुढील दोन दिवसात देशाच्या पूर्व आणि किनारपट्टीच्या भागात उष्णतेची लाट येण्याची शक्यता वर्तवली आहे. प्रामुख्यानं उत्तर कर्नाटकच्या काही भागात, ओडिशा, पश्चिम बंगालचा गंगेजवळील भाग, झारखंड, तेलंगण, आंध्र प्रदेशचा तटवर्ती भाग, यानम, रायलसीमा भागात या लाटेचा प्रभाव असेल, असं हवामान विभागानं म्हटलं आहे.

<><><><><>

विद्यापीठ अनुदान आयोगानं सर्व उच्च शैक्षणिक संस्थांना टेलि मानस या मानसिक आरोग्य टोल-फ्री हेल्पलाइनबाबत विद्यार्थ्यांमध्ये जागरूकता निर्माण करण्याचे निर्देश दिले आहेत. टेलि मानस हेल्पलाइनचा मोठ्या प्रमाणात प्रचार करण्याची आवश्यकता असल्याचं आयोगानं सर्व विद्यापीठांच्या कुलगुरूंना आणि सर्व महाविद्यालयांच्या प्राचार्यांना  पाठवलेल्या परिपत्रकात म्हटलं आहे.

//<><><><><>//